**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): सांगली **P.S.**(ठाणे): सांगली ग्रमीण

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0097 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):20/03/2025 16:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 29/01/2025

**Date To** ( दिनांक पर्यंत): 30/01/2025

**Time From** (वेळेपासून): 13:33 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:55 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 20/03/2025 **Time** (वेळ): 15:21 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 019

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 20/03/2025 15:21 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

उत्तर, 7 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तलाठी कार्यालय कर्नाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
मी धनाजी शिवाजी मोहिते, वय 34 वर्ष, व्यवसाय:- शेती मु.पो.कर्नाळ ता.मिरज जि. सांगली मो.नं. 8830105155

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासमवेत राहणेस आहे. मी कर्नाळ गावामधील गट नं. 161 मधील 1 गुंठा क्षेत्र दुय्यम निबंधक कार्यालय सांगली येथे दि.03.07.2020 रोजी दस्त क्र. 2774/2020 अन्वये खरेदी केलेले आहे. त्यानंतर मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी होणेसाठी अर्ज व कागदपत्रे अंदाजे 7 महिन्यापुर्वी तलाठी कार्यालय कर्नाळ येथे जावून तेथील तलाठी फराकटे यांचेकडे दिलेली होती. मी दिलेली नोंदी संदर्भाची कागदपत्रे याची स्थळप्रतीची काय आवश्यकता आहे असे म्हणून त्यांनी मला कागदपत्रे स्वाक्षरी करून परत दिली नाहीत .

त्यानंतर दि. 27.01.2025 रोजी मी माझे नोंदी संदर्भातील कामाकरीता तलाठी कार्यालय कर्नाळ येथे जावून तलाठी कार्यालयातील तलाठी फराकटे यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांचेशी शेतजमीनीच्या नोंदीबाबत चर्चा करून त्यांना नोंद लवकर घालून देण्याची विनंती केली. त्यावेळी तलाठी फराकटे यांनी नोंद घालुन देण्यासाठी माझेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझी परिस्थिती हालाखीची असून माझ्याकडे इतके पैसे नाहीत असे सांगितले, त्यावेळी तलाठी श्री. फराकटे यांनी तुम्ही पैसे दिले नाहीत तर शेतजमीनीची नोंद धरणार नाही तसेच मी तुम्हाला पुन्हा फोन करतो असे म्हणाले. त्यावेळी मी तलाठी फराकटे यांना पैसे दिल्याशिवाय ते नोंद घालणार नाहीत अशाी माझी खात्री झाली.

मला तलाठी, फराकटे कर्नाळ यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दि. 28.01.2025 रोजी पोलीस उप अधीक्षक, श्री. पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनव्दारे संपर्क करून माझी तलाठी, श्री. फराकटे कर्नाळ यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवून माझी तक्रार कर्नाळ येथे येवून घेणेची विनंती केली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला कर्नाळ येथे आलेनंतर संपर्क करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला संपर्क करून त्यांचेकडील वाहनाचे वर्णन सांगून कर्नाळ नाका येथे आलेनंतर संपर्क केल्यानंतर मी माझेकडील हिरो होंडा सीडी डिलक्स मोटार सायकल क्र. एम.एच.10 ए.डी.6440 वरून 14.55 वा. कर्नाळ नाका.येथे पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यानंतर आम्ही सर्व तेथुन कर्नाळ नाक्याचे पुढील बाजुस असले रोडलगत असले झाडाखाली सुरक्षितपणे जावून थांबलो.

त्यावेळी पाटील साहेब यांनी माझी व पोलीस निरीक्षक श्री. किशोरकुमार खाडे यांची ओळख करून देवून माझे तक्रारीची पुढील कार्यवाही खाडे साहेब हे करतील असे सांगितले. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे माहिती सांगून माझा लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा तलाठी श्री. फराकटे यांचेविरूध्दचा लाच मागणीचा लेखी तक्रारी अर्ज खाडे साहेब यांचे समक्ष हजर केला. खाडे साहेब यांनी माझे तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख दिली. खाडे साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री. मुकेश श्रीरंग मिरजकर यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. सद्दाम बशीर काझी यांनी पंच नं. 2 म्हणून काम करण्याचे निश्चित केलेे. त्यानंतर माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचांनी वाचून मी तोंडी सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याची खात्री झालेनंतर दोन्ही पंचांनी तक्रारी अर्जावर सहया केल्या.

मी दिले लाच मागणीचे तक्रारी अर्जाप्रमाणे खाडे साहेब यांनी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे तलाठी श्री. फराकटे यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरवले. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला तलाठी श्री. फराकटे हे कर्नाळ येथे आहेत का असे विचारले त्यावेळी मी त्यांना तलाठी, श्री. फराकटे हे कर्नाळ गावात नसलेबाबत सांगितले. त्यानंतर फराकटे तलाठी यांचे ठाव ठिकाणाबाबत माहिती घेण्याचे ठरविले. त्यानंतर खाडे साहेब यांनी फराकटे तलाठी यांचा मोबाईल नंबर सेव्ह आहे

असे विचारले तेव्हा मी "फोन लावुन बघु का काय म्हणत्यात का बोलणार नायत फोनवर तुझ्या फोनवर बोल" असे म्हणालो तेव्हा खाजगी इसम श्री.गणेश यांने "मी बोललोय की, ते सांगितल म्हणलयच की," असे म्हणाला तेव्हा मी "काय कमी जास्त होतय का बग की जरा, कसाया मला बग दिल्या नंतर" असे म्हणालो तेव्हा खाजगी इसम गणेश कांबळे "किती कमी करायच सांग" असे म्हणाला तेव्हा मी "किती दिवसात होईल काम, तीस पर्यंत बग झाल तर, आता माग केलतासा तुम्ही,तुच सांगितलास माग एकदा तीस हजारात, आता हे हुतय म्हणुन त्यातन बी बग तेवढ¬ाला झाल तरी असु दे काय आता, मी वीस म्हणालतोखर पन्नास मागणी झाल्या पुढन म्हणल्यावर त्याला आता काय पर्याय न्हाय" असे म्हणालो तेव्हा खाजगी इसम गणेश कांबळे यांनी "थोड¬ा वेळात येणार हाय य" "येवुन जा की, नुसत गाठ घेवुन जा की" "गणेशन बोललय म्हणाव त्यात जरा काय तर ही करा ... अस बोल की एवढ तर बोलचील की नाय मी इचारतो मी परत" असे म्हणाले तेव्हा मला आण्णासाहेब हे थोडया वेळात येणार आहेत असे समजल्याने मी "चालतय अध्र्या तासानं येवु" असे म्हणुन नातेवाईकांचे व इतर होणा-या कामा बाबत चर्चा केली त्यानंतर मी "आता एवढ¬ा दिवस सांगितलय महिना अखेरला आता बोलालो तर पैसे द्यायची काय तर जुळणा घालतो मी... खर दोन दिवसात नोंद घालुन देणार का" असे म्हणालो असता खाजगी इसम श्री.गणेश यांनी "कच्चा कच्चा फेरफार देणार की तुला" असे म्हणाला त्यानंतर मी "कच्च्यात बी नोंद मजे मला मजे कस जरा मला तर आधार होईल रे लक्षात आल का तेवढ तरी करुन दिल तरी मला बर हुईल नोंद धरुन एक कच्चा फेरफार काढुन दिला चालल मग येतो एक अर्धा पाऊण तासात" असे म्हणुन मी व पंच नं.1 असे तलाठी कार्यालया मधुन बाहेर आलो.

त्यानंतर मी व पंच नं.1 मिरजकर असे मोटारसायकल वरून तलाठी कार्यालय कर्नाळ येथून रवाना होवून खाडे साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर खाडे साहेबांनी माझ्या गळ्यामध्ये अडकवलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन बंद केला. त्यानंतर मला व पंच नं.1 मिरजकर यांना पडताळणीची हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

लाच मागणीचे तक्रारी अर्जाचे अनुषंगाने खाडे साहेबानी खाजगी इसम गणेश कांबळे यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, लोेकसेवक श्री.फराकटे यांचेशी गणेश कांबळे याचे बोलणे झाले असुन त्यांनी पन्नास हजार रक्कम कर असे सांगितले असल्याचे व यापेक्षा कमी जास्त होणार नाही किती कमी करायचे असे खाजगी इसम गणेश कांबळे यांनी मला म्हणाले असता मी तीस पर्यंत बगा असे म्हणालो असता खाजगी इसम गणेश कांबळे यांनी मला लोेकसेवक श्री.फराकटे यांची भेट घेवुन गणेश याचेशी बोलणे झाले असल्याचे सांगण्यास सांगितले व आणखी कमी करण्यासाठी लोेकसेवक श्री.फराकटे यांची भेट घेण्यास सांगितले असल्याने खाडे साहेब यांनी मला श्री. फराकटे यांचेकडे पाठवून पडताळणी करण्याचे निश्चीत केले.

त्यानंतर फराकटे आण्णासाहेब हे कार्यालयात आले आहेत का? हे पाहण्यासाठी खाडे साहेब यांनी मला गणेश कांबळे यास कॉल करण्यास सांगितले. त्यानुसार मी माझ्या मोबाईल वरून गणेश कांबळे यांचे मोबाईल नंबर 9552088279 वर कॉल केला परंतु त्यांनी फोन स्वीकारला नाही. त्यामुळे मला व पंच नं.1 मिरजकर यांना कर्नाळ तलाठी कार्यालय येथे जावून फराकटे तलाठी यांची प्रत्यक्ष भेट घेवुन पडताळणी करण्याचे खाडे साहेब यांनी ठरविले.

त्यानुसार खाडे साहेबांनी मला व पंच नं.1 मिरजकर यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.33 वा. सुरू करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून शर्टचे आतमध्ये सोडला व श्री.फराकटे तलाठी यांची कर्नाळ तलाठी कार्यालय येथे भेट घेण्यास जाणेकरीता रवाना केले. त्यानंतर मी पंच नं.1 मिरजकर यांचे सोबत कर्नाळ तलाठी कार्यालय येथे जावून भेट घेतली व नोंदीचे कामाचे अनुशंगाने फराकटे तलाठी यांचेशी चर्चा केली. त्यावेळी मी तलाठी कार्यालयामध्ये गेलो, त्यानंतर माझे पाठोपाठ कार्यालयात असणारे बाकडयावर पंच नं.1 मिरजकर हे जाऊन बसले. जेणेकरून आमचे बोलणे त्यांना ऐकु येईल. त्यानंतर मी श्री. फराकटे तलाठी यांना " आण्णासाहेब नमस्ते " असे म्हणालो तेव्हा आण्णासाहेब यांनी "काय काय आलास जेवण करुन येतो की, आत्ताच आलो जस्ट मिटींग होती, काय" असे म्हणाले त्यानंतर खाजगी इसम गणेश "मी सांगितलय" असे म्हणाला तेव्हा श्री.फराकटे यांनी "सांगितलय ना" असे म्हणाले, तेव्हा मी म्हणालो की, "गणेशच बोलण झालय" "होय तीच जरा चर्चा तुमच्याशी करुन बघाव" असे म्हणाले तेव्हा लोेकसेवक श्री.फराकटे यांनी "येतो की, जेवुन येतो जावुन येतो" असे म्हणाले तेव्हा मी "जेवुन येता.... थांबु" असे म्हणाले तेव्हा लोेकसेवक श्री.फराकटे यांनी मान हालवुन मला थांबण्यास सांगुन कार्यालयातुन बाहेर जावुन त्यांचे मोटार सायकल वरुन गेले त्यानंतर थोडा वेळ आम्ही कार्यालयात बसुन राहिलो कार्यालयातील गर्दी कमी झाल्यानंतर मी गणेश यांस "आल्यावर गणेश तुझी काय आण्णा साहेबांच्या सोबत चर्चा झाली का नायच फोन आलता धनाजी म्हणुन आ का बोलनच झाल नाय काय" असे विचारले तेव्हा खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांनी "बोललोय की, बोललो की मी

डिलक्स मोटार सायकल वरुन 11.30 वाजता खाडे साहेब व त्यांचे पथक थांबले ठिकाणी आलो.

त्यानंतर खाडे साहेबांनी पडताळणीचे अनुषंगाने श्री. फराकटे यांचे ठाव ठिकाणाबाबत माहिती घेण्याकरीता फराकटे, तलाठी यांना फोन करण्याचे ठरवुन मला कॉल करण्यास सांगितला. त्यावेळी मी माझे मोबाईल वरून फराकटे तलाठी यांना कॉल केला परंतु त्यांनी रिसीव्ह केला नाही. त्यानंतर खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी पुन्हा कॉल केला असता, त्यावर मी " नमस्कार आण्णासाहेब " असे म्हणालो, त्यावर फराकटे तलाठी यांनी मला " हा नमस्ते बोला की" असे म्हणाले, त्यावर मी "धनाजी मोहिते बोलतुय" त्यावर लोकसेवक फराकटे, आण्णासाहेब यांनी "बोला की "त्यावर मी "काल गाठ घ्यायला या म्हणून सांगितलेल पद्माळ" त्यावर फराकटे तलाठी म्हणाले की, "व्हय व्हय, मी हाय पद्माळातच लक्ष्मी जवळ आहे. पंचनाम्यासाठी आलोय त्या कॉक कटींगच्या तिथच हाय, गुरवांच्या रानात हाय" त्यावर मी " हाय काय , बर मी येवु का तिथ" असे म्हणालो त्यावर लोकसेवक फराकटे यांनी " मला तिथ वेळ लागणार, मग दुपारी या की, हाय मी आज दिवसभर तिथच हाय" असे म्हणाले, त्यावर मी बर असे म्हणालो त्यावेळी फराकटे, तलाठी यांनी "दुपारी येताय " असे म्हणाले त्यावर मी "दुपारी येतो, किती वाजेपर्यंत येवु तरी"असे विचारले असता, लोकसेवक फराकटे यांनी " या की, दोन-अडीच पर्यंत या की" असे म्हणाले. त्यावर मी "बर बर दोन वाजेपर्यंत येतो मग, तुमच्या पशी मी" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक फराकटे यांनी "या अडीच पर्यंत---- या" असे म्हणाले त्यावर मी हा चालतय असे म्हणून कॉल कट केला. वरील सर्व संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये खाडे साहेब यांनी रेकॉर्ड केले.

खाडे साहेब यांनी केले पडताळणी कारवाईमध्ये तलाठी फराकटे यांनी कामा संदर्भात चर्चा व लाचेची रक्कम कमी जास्त करण्यासाठी पद्माळ येथील कार्यालयात मला भेटण्यास बोलविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मला व पंच नं.1 मिरजकर यांना पडताळणीच्या अनुषंगाने खाडे साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.24 वा. सुरु करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून शर्टचे आतमध्ये सोडला व श्री.फराकटे तलाठी यांची पद्माळे येथे भेट घेण्यास जाणेकरीता रवाना केले.

त्यानंतर मी व पंच नं.1 श्री. मिरजकर यांनी माझ्या मोटार सायकल वरून रवाना होवून पद्माळे तलाठी कार्यालय येथे श्री. फराकटे, तलाठी यांची भेट घेतली. त्यावेळी मी फराकटे तलाठी यांना "मी तिकड बघायलोय तुमाला रोज असताच त्या बाजुला"असे म्हणालो त्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "तिकड नाय, काय म्हणता बोला" असे म्हणाले तेंव्हा मी "तुमीच बोला आता काय काय चर्चा झाली परत" असे म्हणाले◌ा. त्यावर श्री. फराकटे तलाठी यांनी "चर्चा काय अ◌ॅग्रीटेकचे काम सुरु हाय क नाय त्या गडबडीत सगळीच आहेत. काय हिकडल चार बाकीच तुमच काय होणार आहे म्हणल बाकीच काय म्हणणं घेणार मी तुमच हाय म्हणुन सांगितल ते नकोच म्हणत होते" असे म्हणाले तसेच "तेच म्हणत होतो धडपडायलाय लइ दिवसापासुन" असे म्हणाले त्यावर मी "लइ दिवस झाल म्हणजे काय झालय" असे म्हणाले◌ा त्यावर फराकटे तलाठी यांनी "तेच गुंठेवारीमुळ वरुन मिटिंग होती ते हे काय ओ भडिमार, त्यामुळे का नाय उगच हे करुन पाठवायच -- आमाला बी अवघड प्रत्येक गोष्टीत" असे म्हणाले त्यावर मी "माझ बी मी काय सांगायलोय मी दुस-याकडन पैसे काढल देण झालय मला हात ऊसन देण तुम्हाला माहितेय एकवेळ हयस चालतय" असे म्हणालो त्यावर श्री.फराकटे तलाठी यांनी "होय होय" असे म्हणाले. त्यानंतर मी "म्हणुन म्हणल थोड फार कमी जास्त झाल तर तेवढाच आपल्याला आधार म्हणायचा आता तुमचा आणि कसाय आण्णासाहेब" असे म्हणून लाच रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता, श्री. फराकटे तलाठी यांनी "मी तुमच अं तर मी होतच न्हाय बाकीच्यागत थोड त्यांना डायरेक्ट भेटायच ते नकोच म्हणतात ना ते " असे म्हणाले त्यावर मी "आमच्या भावाची आणि माझी चर्चा झाली फराकटे साहेब आहेत म्हणल आता त्यांच्या हातातन हुईल म्हणल ही काम आता " असे म्हणालो त्यानंतर अनोळखी इसम त्या ठिकाणी येवुन फराकटे आण्णासाहेब यांना गेले काय सरपंच असे विचारले त्यावर फराकटे तलाठी यांनी सरपंच उशिरा गायब झाले गेले फोटो काढला तेवढा गेले आयुष्यमान योजनेचे काम सुरु आहे. काम येतय कर्नाळ, पद्माळ असे म्हणाले व त्यानंतर ते म्हणाले की "रोज काय ना काय तर सुरूच हाय, मॅडम रोज भागात दहा अकराला येतात" असे म्हणाले त्यावर मी "हंम त्या पन्नास हजारात काय कमी बघा जरा कायतर, असे म्हणालो असता लोकसेवक फराकटे तलाठी यांनी प.. माझा माहितीप्रमाणे पाच दहा हजार दया नंतर बघु लागलस म्हणल तर, असे म्हणाले त्यानंतर मी "कसाय मी आता पुढ मी बी ही हात ऊसन घेणार हाय काय " असे म्हणाल्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "मी तुमाला काय सांगालोय काय आता लई चाळीस हजार एक करा मी आता लई लांबड लावत न्हाइ तुमाला परत काय सारख" असे म्हणून लाचेची मागणी केली आहे. त्यावर मी "चाळीस" असे म्हणालेनंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "चाळीस करा" असे म्हणून चाळीस हजार रूपये लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "बघु म्हण्टले चार पाच नंतर बघु म्हण्टले तर मी त्यांना सांगुन काय कॉम्प्रमाईज करायचा प्रयत्न करतो खर तुमच काय पाठवल की झाल पाहिजे ओ तुम्ही धडपडताय हे माझा डोक्यात हाय बाकी काय न्हाइ" असे म्हणाले त्यावर मी "हा.. तेच" असे म्हणाले

पद्माळ येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ खाडे साहेब सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने येवून तलाठी कार्यालयाचे आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिले.

त्यानंतर मी तलाठी कक्षामध्ये आतमध्ये गेल्यानंतर पंच नं.1 माझे पाठोपाठ आतमध्ये आले. त्यावेळी पांढ-या रंगाचा शर्ट घातलेले लोकसेवक फराकटे, तलाठी यांनी मला उजव्या हाताचे करंगळी वर करून आलो लगेच थांबा असे म्हणुन लघवीला जावून येतो असा इशारा करून कार्यालयाचे बाहेर असणारे टाकीजवळ गेले. त्यानंतर मी कार्यालयामध्ये उपस्थित गणेश याचेशी बोललो त्यावेळी गणेश कांबळे "त्यावेळेस तु न्याट केला असतास न्हाय, तीस पतुर होत हुत"असे म्हणाला त्यावर मी विचारले की, "मी तुला बोलल्यालो"असे म्हणालो. त्यावर गणेश कांबळे यांने "तीस पतुर होत हुत"असे म्हणाला त्यावर मी तुला विश्वास लागला न्हाय काय असे म्हणालो त्यावर खाजगी इसम गणेश याने "अभिजीतच पाटलाच दिल न्हवतं दिल का न्हाई पप्पानी त्याच गटात हाय का आपली जमीन"असे म्हणाला त्यावर मी "होय" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे याने "काय आड कायलय सर्कल मेळातल न्हाय अन हे बी कड्डु न्हाय आता अशी भानगड हाय आता ऑनलाईन नोंदी आल्या काय न्हाय जर सर्कल मेळात करुन घ्यायचं म्हणल का न्हाय सर्कल म्हणतय तलाठी काल डाटा घेवुन गेलाय मम तुला काय कळले पहिले सर्कल कस हुत माहित हाय का ऑनलाईन नोंदी ऑनलाईन नोंदी जर आल्या पप्पाकडन टिपण काढुन घेणार पप्पा काय म्हणणार काय नाय हे एवढया चार नोंदी लावा कुणाच्या हायत मामा मामा ईश्वास मामा हया नोंदी तेवढया बघा कुणा कुणाच्या हाइत काय करत्यात बघा" असे म्हणाला त्यावर मी 'हु असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे याने "त्यान सांगितल्यावर फुड सांगायच त्यासनी अस अस" "हुं काय बी करा म्हणायच चाळीस वर करा म्हणायचं" असे म्हणाला त्यावर मी "करतो म्हणल्यात की" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे "लईच अडचणीत हाय म्हणायच घर बांधायचे हाय मला बी जगायचे हाय जरा दाबुन जास्त मागत्यात" असे म्हणाला त्यानंतर गणेश कांबळे यास फोन आला व तो त्यंानी उचलुन हा "आण्णा बर काय म्हणतय बघतु" असे म्हणुन कार्यालया बाहेर आला त्यानंतर त्यां पाठोपाठ तलाठी फराकटे अजुन कसे आतमध्ये आले नाहीत हे पाहण्यासाठी मी, बाहेर आल्यानंतर तलाठी फराकटे यांनी गणेश कांबळे यास इशारा केला व गणेश कांबळे याने कार्यालयाचे आवारामधील मोटार सायकल सुरू केली व तलाठी फराकटे हे त्या मोटार सायकलवर गणेश कांबळे याचे पाठीमागे बसले व ते दोघेजण त्या ठिकाणाहून निघून गेले.

त्यानंतर काही वेळाने मी तलाठी फराकटे हे बराच वेळ झाले तरी आले नसल्याने माझे मोबाईल वरून तलाठी फराकटे यांना कॉल केला व मोबाईल स्पिकर मोडवर घेतला त्यावेळी फराकटे तलाठी यांनी "हॅलो" असे म्हणाले त्यावर मी "हा आण्णासाहेब " असे म्हणालो त्यावर तलाठी फराकटे यांनी "हाय ते फोटो काढायला आलाय ना तिकड येतोय हे करायचे आपले एक कृषीची गाडी एक आल्या कृषी ऑफिसची" असे म्हणाले त्यावर मी बर असे म्हणालो त्यावर फराकटे तलाठी यांनी " एक दहा पंधरा मिनीट लागतील" असे म्हणाले त्यावर मी "बर बसु का इथ" असे म्हणालो त्यावर तलाठी फराकटे यांनी "थांबा की मग" असे म्हणाले त्यावर मी "ठीक हाय ठीक हाय तेच म्हणल आलो म्हणला गेला काय समजल न्हाई ठीक हाय" असे म्हणालो व कॉल कट केला. त्यानंतर काही वेळात सदर ठिकाणी गणेश कांबळे हा चालत कार्यालयाजवळ आला.व तलाठी कार्यालयामध्ये आतमध्ये गेला.त्यावेळी मी व पंच नं.1 मिरजकर असे आतमध्ये गेलो. त्यावेळी गणेश कांबळे याने "एकच मिनिट हा रावसाहेब आण्णासाहेब गेले तकडल्या तकडच ते पीक पाण्याचा हे काय म्हणुन रिपोर्ट आणायला मधनच गेले" असे म्हणाला त्यावर मी"पिक पाण्याचा" असे म्हणालोे त्यावर गणेश कांबळे याने "ते अहवाल आणाय गेल्यात" असे म्हणाला त्यावर "मग काय थांब म्हणल्यात मला, फोन केलता मी आण्णासाहेबांना" असे मी म्हणालो त्यावर गणेश याने "आणि एकदा फोन करून बघा" असे म्हणाला त्यावर मी तलाठी फराकटे यांचे मोबाईल वर कॉल केला परंतु त्यांचा फोन व्यस्त असल्याने कॉल लागला नाही. त्यावर गणेश कांबळे म्हणाला की, "फोन कर की काय म्हणतय बघ" असे म्हणाला त्यावर मी "उचलना मगाशी फोन केलता थांब म्हणून सांगितल आता उचलना की" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला की, "न्हाय गडबडीत माझी गाडी घेतली चालु करून दिली अन जावा म्हंटल" "मधला रस्ता ते लक्ष्मीच्या कुड हाय का न्हाय त्यात गेल" असे म्हणाला त्यावर मी, "मग आता थांबा म्हणल्यात तर थांबतो की, मग हाय का न्हाय आय आता उचलणार बी न्हाय" असे म्हणालो. त्यावर तेथील एक अनोळखी इसमाने "तु चालत आलाय म्हणल, गाडी?" असे म्हणाला त्यावर गणेश कांबळे याने "न्हाय न्हाय गाडी घेवून गेल आण्णसाहेब मगाच गेल ते बागांच्या हितन" असे म्हणाला त्यावर अनोळखी इसम "बागराईतन गेल काय" त्यावर गणेश कांबळे हम इकडन रस्ता हाय काय म्हणले त्यावर अनोळखी इसम माहीत हाय न्हव का मधन रोड असे म्हणाले त्यावर मी गणेश ला विचारले की, "तुला कायच बोलल न्हायत काय", त्यावर गणेश कांबळे याने "मला कायच बोलल न्हाय गेल गडबडीत" असे म्हणाला त्यावर मी "मला बोलवलय हे कुठ गेलया मला म्हणल लघवीसन येतो, बॅग तेन तर हाय" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे याने बॅग बीग सगळ हिथ हाय त्यावर मी "मग थांबु का काय" त्यावर गणेश

ठरविले.
त्यानंतर खाडे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 8830105155 वरुन श्री. फराकटे, तलाठी यांचा मोबाइल नंबर 9561278232 वर कॉल त्यावेळी श्री. फराकटे, तलाठी यांचा कॉल लागला नाही. त्यामुळे पुन्हा मी माझे मोबाईलवरुन श्री. फराकटे, तलाठी यांचा मोबाईलवर कॉल त्यावेळी श्री.फराकटे, तलाठी यांचा लागला परंतु त्यांनी कॉल रिसिव्ह केला नाही.
त्यानंतर लोकसेवक श्री.फराकटे तलाठी यांचे ठाव-ठिकाण्या व फराकटे तलाठी यांचा कॉल आला होता काय? याबाबत माहिती घेण्यासाठी खाजगी इसम गणेश कांबळे यांना पुन्हा कॉल करून विचारण्याचे ठरविले.
त्यानंतर खाडे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 8830105155 वरुन खाजगी इसम गणेश कांबळे यांचा मोबाईल नंबर 9552088279 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला असता मी "आर धनाजी बोलतोय आण्णासाहेब, आण्णासाहेबांचा काय फोन बिन" असे म्हणालो असता, गणेश कांबळे म्हणाला की, "आओ फोन उचलनात अजुन त्यांची गाडी माझ्याकडच हाय" त्यावर मी "तुझ्याकडच हाय काय, थांबुन थांबुन मी आलो हिकड म्हणुन म्हणल काय चर्चा झाली का माझा का फोन उलनात रे" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला की, "बघुया उचलत्यात काय, माझा पण फोन उचलनात" त्यावर मी "कस काय गेले अचानक मी तर मोकळा झाला असतो हिकडन कामगार फोन करायल्यात, काय मला बोलल बी नाय तुला काय बोलल का न्हाय" असे म्हणालो त्यानंतर गणेश कांबळे "न्हाय ती काय बोलल, माझा फोन उचलनात, माझा एक फोन उचलनात" असे म्हणाला त्यावर मी "मग आता काय करु मग" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला की, "फोन उचलल्या शिवाय मी तर कस सांगणार सांग बर" त्यावर मी म्हणालो की, "ते बी हायच माझा बी फोन उचलनात रे बिझी लागाय लागलाय आणि फोन उचलनात, बिझी लागला फोन केलता तुझ्या आधी, बिझी लागला खर काय फोनच उचलला नाय, म्हणुन म्हणल तुझ्याशी काय चर्चा झाली काय बघु म्हणुन फोन केला आणि तुला" त्यावर गणेश कांबळे म्हणाला "नाय नाय, त्यावर मी "मग मी गावाकड निघु" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला "चालतय मग" असे म्हणाला त्यानंतर मी म्हणालो की "का थांबु" त्यावर गणेश कांबळे म्हणाला "थांबुन आता काय करतुस" त्यावर मी "मला फोन कर काय झाल तर" त्यावर गणेश कांबळे यांनी "हा करतो" असे म्हणाला व कॉल कट केला. त्यानंतर खाडे साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.
खाजगी इसम गणेश कांबळे यांचेशी झाले चर्चे मध्ये खाजगी इसम गणेश याने कॉल रिसीव्ह केल्यानंतर श्री.फराकटे तलाठी हे गडबडीत असल्या कारणाने गणेश याची गाडी देवून निघुन गेले असलेबाबत व लाच रक्कम स्वीकारणेबाबत काही सांगितले नसलेबाबत तसेच खाजगी इसम गणेश कांबळे याने देखील लाच रक्कम स्वीकारणेबाबत नकार दिला असल्याने मला लोकसेवक श्री.फराकटे, तलाठी किंवा खाजगी इसम यांचा निरोप आल्या नंतर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन सापळा कारवाई मागे घेतली. खाडे साहेबांनी मला तसेच पंच व सापळा पथकास गोपनीयाता पाळणे बाबत सुचना दिल्या.
मी माघवारी निमित्त पंढरपुर येथे जाणार असल्याने जाण्यापुर्वी दि. 31.01.2025 रोजी पुन्हा एकदा लोकसेवक श्री.फराकटे यांना फोन करुन त्यांना भेटण्याची वेळ व ठिकाण ठरवुन लोकसेवक श्री.फराकटे यांना भेटणेस जाणार असुन ते आज रोजी माझेकडुन लाच रक्कम स्विकारतील अशी खात्री वाटत असल्याचे मी खाडे साहेबांना सांगितले. त्यानंतर खाडे साहेबांनी भोरा म्हसोबा फाटा ते माधवनगर जाणारे रोड लगत असले हुपरी गार्डन मंगल कार्यालया समोरील निर्जन ठिकाणी येणे बाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे मी हुपरी गार्डन मंगल कार्यालया समोरील निर्जन ठिकाणी आलो तेथे खाडे साहेब पंच व सापळा पथक येवुन थांबले होते.
त्यानंतर सापळा कारवाईत लोेकसेवक श्री.फराकटे यांना भेटुन लाच रक्कम देणे करिता ठिकाण व वेळ निश्चीत करण्याचे अनुषंगाने लोेकसेवक श्री.फराकटे यांना फोन लावुन सापळा कारवाई कामी वेळ व ठिकाण निश्चीत करण्याचे ठरविले.
त्यानंतर खाडे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 8830105155 वरून लोेकसेवक श्री. फराकटे यांचे मोबाईल नंबर 9561278232 वर कॉल केला असता लोेकसेवक श्री.फराकटे यांचे मोबाईलची रिंग वाजली परंतु लोेकसेवक श्री.फराकटे यांनी कॉल रिसिव्ह केला नाही.
त्यानंतर मी माघीवारी निमित्त पंढरपुर येथे जाणार असलेबाबत खाडे साहेब यांना सांगितले त्यावेळी त्यांनी मला सापळा कारवाई अपुर्ण असून असे जाता येणार नाही असे सांगितले त्यावेळी मी दरवर्षी पंढरपुर येथे माघवारी करीता पायी चालत जात असतो, असे म्हणालो, त्यानंतर खाडे साहेब म्हणाले की, पंढरपुर येथुन आले नंतर तसेच लोकसेवक श्री.फराकटे तलाठी किंवा खाजगी इसम गणेश यांचा निरोप आल्या नंतर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चीत करुन सापळा कारवाई मागे घेतली. खाडे साहेबांनी मला तसेच पंच व सापळा पथकास

40,000/-- रुपये हजर केले. त्यानंतर खाडे साहेबांचे सुचने प्रमाणे मी हजर केले नोटांना अॅन्थ्रासिन पथकातील अंमलदार पोह/मकानदार यांचेकरवी पावडर लावुन 40,000/- रुपये लाचेच्या रक्कमेच्या नोटांची घडी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात श्री.फराकटे यांनी मागणी केल्यानंतर देण्यासाठी ठेवली.
त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं 1 मिरजकर यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.21 वाजता सुरू करून माझे गळयामध्ये अडकवून मला व पंच नं.1 मिरजकर यांना रवाना केले. फराकटे तलाठी यांची भेट घेण्या करिता रवाना केले खाडे साहेब व सापळा पथक आमचे पाठोपाठ येवून कार्यालयाचे काही अंतरावर वाहन पार्क करून आजुबाजुस सापळा लावुन थांबला. त्यानंतर मी व पंच असे कर्नाळ तलाठी कार्यालय येथे गेलो असता त्या ठिकाणी श्री. फराकटे, तलाठी हे कार्यालयात आले नसल्याचे समजले. तसेच त्यांचे कार्यालय बंद असल्याचे आढळले. त्यानंतर खाजगी इसम गणेश कांबळे हा देखील कार्यालयामध्ये उपस्थित नसल्याचे आढळले. त्यानंतर मी कार्यालयामधुन बाहेर आलो व कार्यालयाचे बाजुस जावुन मी फराकटे, तलाठी यांना फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला. सदर कॉल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर पुन्हा मी फोन केला परंतु फराकटे, तलाठी यांनी फोन स्वीकारला नाही. त्यानंतर मी व पंच नं.1 मिरजकर असे मोटार सायकल वरून हुपरी गार्डन मंगल कार्यालय येथे आलो. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 मिरजकर यांना सापळा कारवाईची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.
झाले एकंदरीत सापळा कारवाई मध्ये, फराकटे, तलाठी हे बरेच दिवसापासून तलाठी कार्यालयामध्ये आले नसल्याचे तसेच आज रोजी ते कार्यालयामध्ये उपस्थित नसल्याचे आढळुन आले. खाजगी इसम, गणेश कांबळे हा देखील कार्यालयामध्ये उपस्थित नसुन त्याचेजवळ ही लाचेच्या रक्कमे संदर्भात फराकटे, तलाठी यांचा कोणताही निरोप नसल्याने आज रोजीची सापळा कारवाई मागे घेतली.
त्यानंतर आम्ही सदर ठिकाणाहून निघून अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे आलो. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला सदर कारवाई बाबत गोपनियता राखणेे बाबत सुचना दिल्या. तसेच तलाठी फराकटे अगर खाजगी इसम गणेश कांबळे यांचा निरोप आल्यास त्यांचेशी संपर्क साधणे बाबत सुचना दिल्या. त्यावेळी मी खाडे साहेबांना पंचांसमक्ष सांगितले की, " फराकटे, तलाठी यांना संशय आला असल्याने तसेच गावामधील लोकांचे चर्चेमधुन फराकटे, तलाठी यांचेविरूध्द कोणीतरी सापळा लावला असलेबाबत चर्चा असल्याने, फराकटे तलाठी हे बरेच दिवसापासून कर्नाळ तलाठी कार्यालयात बरेच दिवसापासून येत नसून, ते आता माझ्याकडून लाच रक्कम स्विकारणार नाही याची मला खात्री आहे. तसेच फराकटे, तलाठी कर्नाळ यांनी यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी धरण्यासाठी स्वत: करीता 50,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती स्वत: करीता माझेकडे 40,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तसेच खाजगी इसम गणेश कांबळे यांने शेतजमीनीची नोंद फराकटे, तलाठी यांचेकडून मंजुर करून घेण्यासाठी फराकटे तलाठी यांचे नावाने 50,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तरी फराकटे, तलाठी कर्नाळ व खाजगी इसम गणेश कांबळे यांचेवर कारवाई व्हावी" असे सांगितले. खाडे साहेब यांनी तसा माझा लेखी जबाब दोन्ही पंचासमक्ष नोंदविला आहे.
उपरोक्त प्रकरणी दि. 29.01.2025 रोजी 13.33 वा. ते 15.48 वा. च्या पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी कार्यालय कर्नाळ येथे फराकटे, तलाठी कर्नाळ यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी धरण्यासाठी स्वत: करीता 50,000/- रूपये लाचेची मागणी करून व रक्कम कमी करणेबाबत चर्चा करून, दिनांक 30/01/2025 रोजी 14.24 ते 14.55 वा. च्या पडताळणी कारवाई दरम्यान पदमाळ तलाठी कार्यालय येथे तडजोडीअंती 40,000/- रु. लाचेची मागणी केली व प्रथमत: त्यांचे कार्यालयामध्ये काम करणारे खाजगी इसम गणेश कांबळे याचेशी माझे नोंदीसंदर्भात चर्चा करण्यास सांगितले होते, त्याप्रमाणे मी खाजगी इसम गणेश कांबळे यांचेशी माझे नोंदी संदर्भात चर्चा केली असता, खाजगी इसम गणेश कांबळे यांनी तलाठी फराकटे यांचे सांगणेनुसार माझे काम करून देणेसाठी माझ्याकडे लाच रक्कम मागितलेने मला तलाठी फराकटे यांनी लाच देणेसाठी प्रोत्साहीत केले आहे. तसेच खाजगी इसम गणेश कांबळे याने माझे शेतजमीनीची नोंद श्री. फराकटे, तलाठी यांचेकडून करून घेण्यासाठी दिनांक 29/01/2025 रोजी, 12.19 ते 12.37 वा चे पडताळणी कारवाई दरम्यान, श्री. फराकटे, तलाठी यांचेकरीता माझेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तसेच लाच रक्कम कमी-जास्त करणेबाबत तलाठी फराकटे यांना भेटणेकरीता सांगुन लाच देणेस मला प्रोत्साहीत केले आहे. म्हणून माझी लोकसेवक तानाजी फराकटे, तलाठी कर्नाळ, ता. मिरज जि. सांगली वर्ग-3 व तलाठी कार्यालय कर्नाळ येथे काम करणारा खाजगी इसम गणेश कांबळे यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): धनाजी शिवाजी मोहिते

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कर्नाळ तामिरज जि सांगली,सांगली ग्रमीण,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कर्नाळ तामिरज जि सांगली,सांगली ग्रमीण,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8830105155

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तानाजी फराकटे तलाठी सजा- कर | | | 1. सजा- कर्नाळ,सांगली ग्रमीण, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गणेश कांबळे खाजगी इसम | | | 1. सजा- कर्नाळ,सांगली ग्रमीण, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

का असे विचारले त्यावेळी मी फराकटे तलाठी यांचा सेव्ह असलेला मोबाईल नंबर खाडे साहेब यांना दाखविला.

त्यानंतर खाडे साहेब यांनी सुचना दिल्याप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 8830105155 वरून श्री. फराकटे तलाठी यांचा मोबाईल नंबर 9561278232 यावर 16.21 वा. कॉल केला परंतु फराकटे तलाठी यांनी रिसीव्ह केला नाही. त्यानंतर 16.48 वा. श्री. फराकटे आण्णसाहेब यांचा माझ्या मोबाईल वर कॉल आला परंतु तो कॉल शॉर्ट असल्यामुळे रिसीव्ह करण्या अगोदरच कट झाला. त्यानंतर पुन्हा खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी फराकटे तलाठी यांना कॉल केला त्यावेळी मी " हॅलो फराकटे आण्णासाहेब " असे म्हणालो, त्यावर फराकटे तलाठी यांनी मला " हॅलो हा कुठाय" असे म्हणाले, त्यावर मी " हाय गावात तुमचीच वाट बघालतो फोनची" त्यावर लोकसेवक फराकटे यांनी " बर बर मी जरा बाहेर आलोय इथ, सांगितलय गणा कांबळेला सांगितलय त्याला" असे म्हणाले, त्यावर मी त्यांना कुणाला गणाला सांगितलय काय असे विचारले असता, लोकसेवक फराकटे यांनी "होय " असे सांगीतले. त्यावर पुन्हा मी "मग आपण गाठ घेवु या का नको, का त्याचीच गाठ घेवु" असे विचारले असता, लोकसेवक फराकटे यांनी "अस करा की, फोन करा त्याला " असे म्हणाले त्यावर मी "फोन करू काय त्याला" असे विचारले त्यावर फराकटे यांनी मला "फोन करा किंवा उद्या सकाळ गाठ घ्या त्याची" असे सांगितले, त्यावर मी " बर-बर-बर चालतय , तुमी आता कुठाय" असे विचारले त्यावर फराकटे यांनी " लय काम घेवुन बसलोय आता " असे सांगीतले, तेंव्हा मी " अस झाल व्हय" त्यावर श्री. फराकटे तलाठी यांनी " परत तुमी फोन करणार " असे म्हणाले, त्यावर मी " म तेच तुमची वाट बघत थांबल्यालो म्हणून म्हणल मी" "बर बर करतो त्याच्याशी, हा " असे म्हणून कॉल कट केला. त्यानंतर खाडे साहेब व दोन्ही पंचांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉडींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला गणा कांबळे ही व्यक्ती कोण आहे असे विचारले असता, मी सांगितले की, गणा कांबळे ही खाजगी व्यक्ती असून श्री. फराकटे आण्णासाहेब यांचे सांगणेप्रमाणे ऑफिसमधील कामे पाहत असतो असे सांगितले. खाडे साहेब यांनी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये तलाठी, फराकटे यांनी मला खाजगी इसम गणेश कांबळे याची उद्या गाठ घेणेबाबत सांगितले असल्याने दि. 29.01.2025 रोजी खाजगी इसम गणेश कांबळे याचेशी कामा संदर्भात चर्चा केल्यानंतर खाजगी इसम गणेश लाचेच्या रक्कमेबाबत खुलासाकरण्याची शक्यता वाटत असल्याने मला दि. 29.01.2025 रोजी पडताळणी करीता पाठविण्याचे खाडे साहेब यांनी निश्चित केले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला सदर कारवाई बाबत गोपनीयता राखणेबाबत व संपर्क केल्यानंतर हजर राहणेच्या सुचना दिल्या व जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी सदर ठिकाणाहून निघून गेलो.

दिनांक 29/01/2025 रोजी खाडे साहेबांनी 11.30 वा.चे सुमारास फोन करुन भोरा म्हसोबा जवळ असले मगदुम मंगल कार्यालयाचे पाठीमागील बाजुस येणे बाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे मी माझे हिरो होंडा सीडी डिलक्स मोटार सायकल वरुन 12.05 वाजता खाडे साहेब व त्यांचे पथक थांबले ठिकाणी आलो.

त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं.1 मिरजकर यांना पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.19 वा. सुरू करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून शर्टचे आतमध्ये सोडला व खाजगी इसम गणेश कांबळे यांची कर्नाळ तलाठी कार्यालय येथे भेट घेण्यास जाणेकरीता रवाना केले.

त्यानंतर मी व पंच नं.1 श्री. मिरजकर असे कर्नाळ तलाठी कार्यालय येथे जावून खाजगी इसम गणेश याची भेट घेतली. त्यानंतर मी गणेश कांबळे याचेशी नोंदीच्या कामाचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी मी "काय ... आपल काय बघितल नोंदीच काय ... नोंदीच काय बघितल, आण्णासाहेब काय काय बोलले" असे म्हणालो, तेव्हा गणेश कांबळे हा "एक कमी करु नको .. पाचच कर" असे म्हणाला तेव्हा मी "पाच हजार, पन्नास हजार... पन्नास हजार बोललेत .... काय सांगतुयस" असे म्हणालो तेव्हा गणेश कांबळे याने "मग काय कालच सांगितलेल.... फोन केलता काल" असे म्हणाला त्यानंतर मी आण्णासाहेब यांचे भेट झाली नसुन फोनवर चर्चा झाली व त्यांनी "तुझ्या बरोबर....गणेश बरोबर चर्चा झाल्या गणेशला काय सांगायच ते सांगितलय.. आणि गणेशची गाठ घे" असे म्हणाले तेव्हा खाजगी इसम गणेश कांबळे यांनी "समजल का आता तुला" असे म्हणाले तेव्हा मी "पन्नास हजार मागणी झाल्या तुमी काय कमी जास्त हुतच का बगायच नायस का जरा फोन लावुन" असे म्हणालो. दरम्यान कार्यालयात एक अनोळखी इसम आले त्यांनी खाजगी इसम गणेश कांबळे नावाने हाक मारुन त्यांना आण्णासाहेब येणार आहे का असे विचारले तेव्हा खाजगी इसम गणेश कांबळे यांनी "येणार हायत" असे म्हणाले तेव्हा मी "आण्णासाहेब येणार हायत... म काय चर्चा करतील बुलतील" असे म्हणालो असता खाजगी इसम गणेश कांबळे यांनी " झालय सांगितल फोनवरच मला काल" असे म्हणाला तेव्हा मी म्हणालो की, "आर बग की, फोन लावुन काय कमी जास्त हुतय का बग की," तेव्हा खाजगी इसम गणेश कांबळे यांनी "कमी जास्त नाय" असे म्हणाला तेव्हा मी " माझ्यासाठी बग रे ... तुला माहितीय मी आता किती कशा गोष्टी हायत काय हायत अस पेचात हाय मी चांगला मागल्या गोष्टी तुमी कशा केलतासा त्या हिशोबान तर बग काय हुतय का मला पैशाची जुळणा" असे म्हणालो, त्यानंतर गणेश कांबळे याने "काय म्हणलास"

मोहिते येऊन गेलत म्हणुन सांगितल की, यावर ते माझ मीच बघतो म्हणले" असल्याचे सांगितले तेव्हा मी "तस विषय नाय रे परत माघारी आणि काय तर म्हणल मजे आणि काय होय क नाय" असे म्हणालो तेव्हा खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांनी "मी बोललो ते ती काय सांगतय ऐक काय समोर विचारणार असलास तर विचार" "समोर विचारलस तरी माझी काय अडचण नाय" असे म्हणाले त्यानंतर आम्ही तलाठी कार्यालयाचे बाहेरील बाजुस अंदाजे पंधार मिनीटे थांबलो होतो.

त्यानंतर मी तलाठी श्री.फराकटे यांना फोन लावला असता त्यांनी फोन रिसिव्ह केला व "आलोय येतोयच पाच मिनीटात आलोच गाडीवर हाय" असे म्हणाले त्यानंतर मी व पंच नं.1 मिरजकर असे कार्यालयात जावुन बसलो व त्यानंतर लो◌ेकसेवक श्री.फराकटे हे थोड¬◌ा वेळाने आले त्यानंतर कार्यालयात गर्दी असलेने व इतर लोकांची काम व संभाषण चालु होते. त्यानंतर अंदाजे तासा नंतर गर्दी कमी झाल्यावर माझेत व लो◌ेकसेवक श्री.फराकटे यांचेत कामा बाबत चर्चा झाली दरम्यान मी एक गुंठ¬◌ाच्या नोंदी बाबतच्या कामाबाबत चर्चा करुन "पन्नास हजार रक्कम लय हुत्या" असे म्हणालो असता लोकसेवक फराकटे यांनी "मेंबर लय हे कराय लागल" असे म्हटले त्यानंतर काही संभाषणानंतर मी "मग ते गण्यांन बोलला तेवढासच आकडा करायचा व्हय" असे विचारले असता लोकसेवक फराकटे यांनी "उद्या विचारुन बघतो" असे म्हटले तसेच त्यांनी "याबाबत गणाला याबाबत बोलण्यास सांगितले होते" असेही सांगितले. त्यानंतर मी "किती करायला किती लागल" असे विचारले असता लो◌ेकसेवक श्री.फराकटे यांनी "काय त्यांना पाच दहा कमी कराय लावुया थोड तुमच्यासाठी म्हणुन आणि कमी बी करतील" असे म्हणाले तेव्हा मी "पाच दहा हजार" असे म्हणालो असता लो◌ेकसेवक श्री.फराकटे यांनी "होय दोन पाच कमी करतील मी विचारुन बघतो मी तुमाला फायनल सांगत नाय तेवढ कमी करायला लावीन मी माझे हायत म्हणुन सांगतो बाबा असु दे म्हणुन म्हणुन ह फोन करतो मी उद्या तु मला" असे म्हणाले त्यानंतर मी "कारण एवढ¬◌ा दिवस थांबलोय आणि प्रकरण एवढ¬◌ा दिवस थांबलय आता आलय पुढनं म्हणल्यावर तर थांबावच नाय माझ्या मनात हाय" असे म्हणाले असता लो◌ेकसेवक श्री.फराकटे "द्याकी बनवुन असु दे म्हणुन हेच करु नका नकोच म्हणाले आमचा मेंबर धडपडल्यामुळे बरेच दिवस झाले म्हणलो त्यांच काय आसल तर सांगा म्हणल मी बोलतो त्यांना" "त्या हिकड तिकड पाच सात हजार होईल बाकी काय दुसर हुणार नाय काय एवढं" असे म्हणाले तेव्हा मी "तरी किती पण एक चार पाच हजार" असे म्हणालो तेव्हा लो◌ेकसेवक श्री.फराकटे "काय पाच दहा हजार केल तर ती पण तुमाला सांगतो सरळ पाच तुमच्यासाठी कमी करायला लावतो मी आणि काय लास्ट" "पंचेचाळीस पर्यंत कराय लावतो मी" असे म्हणाले तेव्हा मी "किती म्हणाला" तेव्हा लो◌ेकसेवक श्री.फराकटे यांनी "पाच कमी करतील केल तर" असे म्हणाले तेव्हा मी "पंचेचाळीस पर्यंत" असे म्हणाले असता लो◌ेकसेवक श्री.फराकटे◌े यांनी "◌ंहं" असे म्हणाले तेव्हा मी "तेवढ¬◌ाला तर हुतील" असे म्हणालो असता लो◌ेकसेवक श्री.फराकटे यांनी "विचारतो म्हणतो तुमाला अजुन कन्फर्म कुठ सांगाय लागलोय यस म्हणले का तुमाला फोन करतो मी मॅसेज टाकतो" तसेच उद्या फोन करतो असे म्हणाले तेव्हा मी त्यांना उद्या फोन करु का असे म्हणालो असता लो◌ेकसेवक श्री.फराकटे यांनी "हं उद्या यायच मजे डिग्रज मध्ये या पद्माळत हाय मी उद्या सकाळी चक्कर मारुन जावा मग नाय झाल तर देवुन टाकुया" असे म्हणाले तेव्हा मी उद्या येतो असे म्हणून तलाठी कार्यालया मधुन बाहेर आलो.

त्यानंतर मी व पंच नं.1 असे खाडे साहेब, पाटील साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर खाडे साहेबांनी माझ्या गळयामध्ये अडकवलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन बंद केला. त्यानंतर मला व पंच नं.1 मिरजकर यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

खाडे साहेब यांनी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये श्री.फराकटे व माझ्यामध्ये खरेदी दस्ताची नोंद घालणे संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लो◌ेकसेवक श्री.फराकटे यांनी माझ्याकडे तक्रारी अर्जात नमुद असले प्रमाणे 50,000/- रुपचे लाच रक्कम मागणी करुन त्यामध्ये पाच हजार कमी करुन 45,000/- (पंचेचाळीस हजार) रुपये लाचेची मागणी करुन उद्या फायनलनिश्चीत करुन सांगतो असे सांगुन उद्या पद्माळे येथे ड¬◌ुटी असल्याने पद्माळे येथे येवुन भेटण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या अनुषंगाने दि. 30.01.2025 रोजी पुन्हा श्री. फराकटे तलाठी यांचेकडे मला पाठवून पडताळणी करून त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला सदर कारवाई बाबत गोपनियता राखणेच्या व संपर्क केलेनंतर हजर राहणेबाबत सुचना देवून जाणेबाबत सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहून निघून गेलो.

त्यानंतर दिनांक 30.01.2025 रोजी खाडे साहेबांनी 11.00 वा.चे सुमारास फोन करुन भोरा म्हसोबा जवळ असले मगदुम मंगल कार्यालयाचे पाठीमागील बाजुस येणे बाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे मी माझे हिरो होंडा सीडी

त्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "ते पुन्हा करायच आपण शेरे पडले ये रे माझा मागल्या मग मी तुमाला काय सांगालोय पण ते चार पाच देऊन टाकुया पुन्हा काय म्हणले तर माग पुढ बघु आस मी तुमाला म्हणतोय बघा तुम्हाला ही पटतय काय नाय बघा" असे म्हणाले त्यावर मी "नाय नाय तुमच्यावर तर विश्वास हाय म्हणुन तर चालु आहे, चाळीस मग चाळीस हजार देऊया म्हणताय " असे म्हणालो त्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "ते असु दे सांगतोय जरा मी" असे म्हणाले त्यानंतर मी "कधी देऊ" असे विचारले त्यावर फराकटे तलाठी यांनी "कधी पण दया हेलपटा करुन, उतारा आणुन देतो " असे म्हणून लाच रक्कम स्वीकारणेबाबत होकार दिला आहे. त्यानंतर मी "कस. कसाय मी आता तुमी काल आपली चर्चा झालती" असे म्हणाले ा त्यावर श्री. फराकटे तलाठी यांनी "असेल तर लगेच आणुन दया तुम्हाला फेरफार करुन देवुन टाकतो म्हणजे त्या त्या वेळी पाठवुन टाकतो" असे म्हणाले त्यावर मी "म्हणजे कसे म्हणजे किती दिवसात होईल नोंद" असे म्हणालो त्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "घातल्या पासुन सोळा दिवस लागत्यात ना" असे म्हणाले त्यानंतर मी "नोंद धरल्यापासुन सोळा दिवस, बर ती कुणापशी आणुन देऊ मी आता सांगुन ठेवलय" असे म्हणालो त्यावर श्री. फराकटे यांनी "आणलेत का" असे म्हणाले त्यावर मी "नाय आणले नाय खर काय कमी जास्त होईल त्या हिशोबान कसाय, मी तेच्या पशी जाणार एक लक्षात घ्या, मी तेच्या पशी जाणार आणि बाबा एवढयावर आणलय आणि आण्णासाहेबांनी एवढे पैसे सांगितलेत एवढे दयायचेत तेवढ ये म्हणुन हया विषयावर थांबलोय फक्त कुणापशी दयायच, त्या विषया साठी मी खास करुन आलतो मी तुमच्यापशी आता आणि किती अमाऊंट दयायची एवढीच दुसर काही नाही" असे म्हणाल्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "आता देणार" असे म्हणाले त्यावर मी "खर मला कसाय" असे म्हणालो त्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "पोराकडे दया मी सांगतो कि दुसरा ऑपरेटर आहे सांगतो मी त्याला लगेच" असे म्हणालो त्यानंतर मी "हा" असे म्हणालेनंतर श्री. फराकटे तलाठी यांनी "लगेच येणार असेल तर या जावा" असे म्हणाले त्यानंतर मी "सांगलीत जातो आणि घेवुन येतो " असे म्हणालो त्यावर श्री. फराकटे तलाठी यांनी "या" असे म्हणून मला लाच रक्कम घेवून येणेबाबत सांगितले. त्यानंतर मी "चाळीसच घेवुन येवु" असे म्हणाले त्यावर श्री. फराकटे तलाठी यांनी "चाळीसच द्या, बाकीच देवुन टाकतो विषय फेरफार देतो त्यांच्याकडे" असे म्हणाले त्यानंतर मी "बर ठीक आहे मग हया दोन दिवसात आपल फेरफार सोळा दिवस नोंदीला लागणार" असे म्हणाले त्यावर फराकटे तलाठी यांनी "दहा दिवसात तुमाला नोटीस दयायची व्यवस्था मी करतो" असे म्हणाले त्यावर मी 'बर चालतय येतो तासभरात" असे म्हणून कार्यालयाचे बाहेर आलो. त्यानंतर मी व पंच नं.1 मिरजकर असे मोटारसायकलवरून तलाठी कार्यालय पद्माळ येथून रवाना होवून खाडे साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो

त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं.1 मिरजकर यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

मी दिलेल्या लाचेच्या मागणीच्या तक्रारीच्या अनुषंगाने खाडे साहेब यांनी पडताळणी केली असता, मी खरेदी केलेल्या शेतजमीनीची नोंद धरणेकरीता लोकसेवक श्री.फराकटे यांनी स्वत:करीता 50,000/- रूपये लाचेची मागणी करुन चर्चेअंती 40,000/- रु लाचेची मागणी केली तसेच ते स्विकारणेचे मान्य करून लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक श्री. फराकटे तलाठी यांनी मला लाच रक्कम घेवुन येण्यास सां ंगितल्याने सर्वानुमते फराकटे तलाठी याचेविरूध्द तलाठी कार्यालय, पद्माळ या ठिकाणी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मगदुम मंगल कार्यालय या ठिकाणी दोन अनोळखी इसम आले असल्याने गोपनीयतेचा भंग होवू नये याकरीता खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे सापळा पथक व मी असे निघून माधवनगर रोडलगत असले एका निर्जन घराजवळ जावून थांबलो.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसणेच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो.

त्यावेळी खाडे साहेब यांनी मला दिले सुचने प्रमाणे लाच म्हणुन द्यावी लागणारी माझेकडील शिल्लकीतील 500/- रूपये दराच्या 80 नोटा असे 40,000/- रुपये पंचा समक्ष हजर केले. खाडे साहेबांनी सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर मी, दोन्ही पंच, श्री. खाडे साहेब यांनी सही केली.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील पोह/मकानदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व खाडे साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देवून, डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.55 वाजता सुरु करून माझे गळयामध्ये अडकवून मला व पंच नं.1 मिरजकर यांना रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 असे माझेकडील मो.सा.ने रवाना होवून तलाठी कार्यालय

कांबळे म्हणाला की, "काय करतय कुणास ठाऊक काय माहित आता मी कस सांगणार" त्यावर मी "मला मोकळ करून जातील का न्हाय" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला की, "फोन करून बघ मला तर काय सांगु मी हिथ" त्यावर मी "तुला काय त्यांची गाडी घेवुन जा म्हणल्यात का काय तु गाडी घेवुन आला नाहीस" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला की "मी गाडी घेवुन जाणार अप्परला आता" त्यावर मी म्हणालो की, "आण्णसाहेबांची" त्यावर गणेश कांबळे म्हणाला "होय", त्यावर मी म्हणालो की, "आण्णासाहेब इकड येणार न्हायत" त्यावर गणेश कांबळे म्हणाला "काय म्हाईत न्हाय सां.. फोन करतो म्हणले मला इकड येणार असेल तर, तु जा मी आता घराकडे जाणार हाय घराकड जावुन मग अप्परली जाणार हाय असे म्हणाला, त्यावर मी म्हणालो की, "मी आण्णासाहेबांना फोन लावला मग तुझ्या फोन वरन फोन लावुन तर बघ थांब म्हणत्यात का जा म्हणत्यात काय" त्यावर गणेश म्हणाला की "तुझा फोन उचलनात माझा कसा फोन उचलणार" त्यावर मी म्हणालो "ती बी गोष्ट तेवढीच खरी, गाडीवर असले तरी फोन उचलणार न्हाय" त्यावर गणेश म्हणाला "न्हाय उचलणार ते माझ एक एक वेळा फोन उचलत न्हाय माझाबी, मला फोन आल्यावर मग तिकडे कुठ तर गाडी दयायला जाया लागणार हाय मला तर एक ताप हाय व्हय" त्यावर मी "न्हाय तेबी हायच की मला आला येवुन थांब जा कर काय मला गणितच काय कळनाच" असे म्हणालो, त्यावर गणेश कांबळे पिं्रटर सगळ हे ठेवुन येतो घरात, रिपोर्ट दयायला जायाच हाय सांगलीला पुन्हा काय सांगायच,े केलास का फोन, आणि एकदा फोन करून बघ असे म्हणाला, तेंव्हा तक्रारदार यांनी हा म्हणून फराकटे तलाठी यांना कॉल केला व मोबाईल स्पिकर मोडवर घेतला. परंतु फोन रिसिव्ह केला नाही.

त्यानंतर गणेश कांबळे म्हणाला आम्ही "चालल्यालो मळीकड माती बघायला तेवढयात त्या सायबांचा फोन आला मग आण्णा इथन जावा म्हणल मधन वाट हाय" त्यावर मी "मला तर घेवुन जावा येतील का न्हाय इथ", "तुमी बघा एखादा फोन करून" असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला "बघतो माझातर उचलला तर ठिक, नाय तर काय करणार, बघ एक दहा मिनीट वाट" , तेव्हा मी हा असे म्हणालो त्यावर गणेश कांबळे म्हणाला की, "मी बी फोन करतो, माझा उचलला तर तुला फोन करता"े, त्यावर मी हा "तुला फोन केला तर, तु फोन कर, मला फोन आला तर मी फोन करतो तुला" असे म्हणालो, त्यानंतर खाजगी इसम गणेश कांबळे सदर ठिकाणाहून तलाठी, फराकटे यंाची मोटार सायकल घेवून पिं्रटर व इतर साहित्य घेवुन तेथील एका अनोळखी इसमास मागे बसवुन तेथुन निघून गेला.

त्यानंतर श्री.फराकटे तलाठी हे 40,000/- रुपये लाच रक्कम न स्वीकारता पद्माळ तलाठी कार्यालय येथून निघुन गेल्याने मी व पंच नं.1 मिरजकर असे वाट पाहून त्यानंतर सदर ठिकाणा वरुन रवाना होवुन हुपरी गार्डन मंगल कार्यालय येथे आलो. खाडे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 मिरजकर यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली त्या अनुषंगाने मी वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर खाडे साहेब यांनी पांढरा शर्ट घातलेला व बाहेर पाण्याचे टाकीकडे आलेला इसम व ज्या व्यक्तीचे पाठीमागे बसून पांढरा शर्ट घातलेला इसम निघून गेले तो अनोळखी इसम कोण याबाबत विचारले असता, मी सांगितले की, पांढरा शर्ट घातलेला इसम हा श्री. फराकटे तलाठी असून, ज्या व्यक्तीचे पाठीमागे फराकटे तलाठी बसले तो गणेश कांबळे आहे. असे सांगितले. त्यानंतर खाडे साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत कारवाईमध्ये लोकसेवक श्री.फराकटे हे तलाठी कार्यालयाचे बाहेर येवून पाण्याचे टाकीजवळ येवुन त्यांनी बाहेरील बाजुस पाहणी केली, व ते सदर ठिकाणाहून लाच रक्कम न स्वीकारता निघुन गेले.

त्यानंतर श्री. फराकटे तलाठी यांचे ठाव-ठिकाण्या बाबत तसेच लाच रक्कम देणेचे ठिकाण फोन करुन विचारण्याचे मी व खाडे साहेब यांनी सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर खाडे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 8830105155 वरुन श्री. फराकटे, तलाठी यांचा मोबाईल नंबर 9561278232 वर कॉल त्यावेळी श्री.फराकटे, तलाठी यांचा मोबाईल नंबर व्यस्त होता. त्यामुळे त्यांना कॉल लागला नाही.

त्यानंतर लोकसेवक श्री.फराकटे तलाठी यांचे ठाव-ठिकाण्या व फराकटे तलाठी यांचा कॉल आला होता काय? याबाबत माहिती घेण्यासाठी खाजगी इसम गणेश कांबळे यांना कॉल करून विचारण्याचे ठरविले. त्यानंतर खाडे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 8830105155 वरुन खाजगी इसम गणेश कांबळे यांचा मोबाईल नंबर 9552088279 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला असता खाजगी इसम गणेश कांबळे यांचेशी झाले चर्चे मध्ये मी, खाजगी इसम गणेश कांबळे यास तलाठी फराकटे यांचे ठिकाणाबाबत व त्यांचा कॉल आला होता काय? याबाबत विचारपूस केली परंतु तलाठी फराकटे यांचे ठिकाणाबाबत माहिती मिळाली नसल्याने श्री.फराकटे, तलाठी यांना पुन्हा कॉल करून त्यांच्या ठिकाणाबाबत माहिती घेण्याचे आम्ही सर्वानुमते

गोपनीयाता पाळणे बाबत सुचना दिल्या.
त्यानंतर दिनांक 10/02/2025 रोजी मी पंढरपुर वारी वरुन परत आले नंतर खाडे साहेबांना फोन करुन पंढरपुर वारी वरुन परत आलो असुन आज पुन्हा लोकसेवक श्री.फराकटे यांची भेट घेण्यास जाणार असुन ते आज रोजी माझेकडुन लाच रक्कम स्विकारतील अशी खात्री वाटत असल्याचे सांगितलेने खाडे साहेबांनी मला भोरा म्हसोबा फाटा ते माधवनगर जाणारे रोड लगत असले हुपरी गार्डन मंगल कार्यालया समोरील निर्जन ठिकाणी येणे बाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे हुपरी गार्डन मंगल कार्यालया समोरील निर्जन ठिकाणी दाखल झालो
कर्नाळ ग्रामपंचात कार्यालय येथे श्री.फराकटे तलाठी यांचे विरुद्ध सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केलेत्यानंतर खाडे साहेबांनी मला लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध आहे का असे विचारले असता मी एकुण 40,000/-- रुपये हजर केले त्यानंतर खाडे साहेबांचे सुचने प्रमाणे मी हजर केले नोटांना पथकातील पोह/मकानदार यांचेकरवी अॅन्थ्रासिन पावडर लावुन 40,000/- रुपये लाचेच्या रक्कमेच्या नोटांची घडी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात श्री.फराकटे यांनी मागणी केल्यानंतर देण्यासाठी ठेवली. त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं 1 मिरजकर अश्यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.12 वाजता सुरु करून माझे गळ्यामध्ये अडकवून मला व पंच नं.1 मिरजकर यांना रवाना केले.
त्यानंतर मी व पंच असे कर्नाळ तलाठी कार्यालय येथे गेलो. खाडे साहेब व सापळा पथक आमचे पाठोपाठ येवुन तलाठी कार्यालय कर्नाळ परिसरात आजुबाजुस सापळा लावुन थांबुन राहिला. त्यानंतर मी तलाठी कार्यालयामध्ये गेलो त्यावेळी तेथे लोकसेवक श्री.फराकटे तलाठी हे कार्यालयात हजर नसल्यामुळे भेट झाली नाही तेथे हजर असलेले खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांची भेट झाली असता श्री.गणेश कांबळे यांनी "झाला का पंढरपुर" असे विचारले तेव्हा मी खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांना "गणेश.... पंढरपुरासन आलो की, ... कुठायत फराकटे साहेब कुठायत" असे विचारले असता "आण्णा आले नाहीत" असे खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांनी सांगितले. त्यानंतर मी कार्यालयात गर्दी असलेने वीस ते पंचवीस मिनीट थांबुन राहिलो त्यानंतर कार्यालयातील गर्दी कमी झाल्यानंतर मी खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांना "गणेश काय आपल झाल का नय" असे विचारले असता खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांनी "नाही आबा, मी कशाला विचारत बसु" "नाय आबा आपण कसल्या फंदात पडत नाय.... आपण उतारे, दाखल" असे म्हणाले तेव्हा मी "ते इषय नाय रे तुझ्यापाशी सांगितलेल निरोप दिलता म्हणुन म्हटल त्या दिवशी घेवुन येवुन गेल" असे म्हणालो तेव्हा खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यांनी "नाय चौकशी नाय केली मी" असे सांगुन लोकसवेक श्री.फराकटे कधी आले होते याबाबत दोघात चर्चा झाली त्या दरम्यान मी खाजगी इसम श्री.गणेश कांबळे यास लोकसेवक श्री.फराकटे यांना फोन लावण्यास सांगितले असता गणेश याने मला श्री.फराकटे यांना तुच फोन लाव असे म्हणाला. त्यानंतर मी व पंच नं.1 कार्यालयाचे बाहेर आलो. तसेच खाजगी इसम श्री.गणेश कांबळे हा देखील बाहेर आला. त्यानंतर मी "जाऊ काय मग, फोनबीन करुन बग, मला निरोप देणार काय ?, फोन करुन विचार काय ते सांग" असे गणेश कांबळे याला म्हणालो असता गणेश याने "चालतय, करतोय फोन करतोय, निरोप देतो की, सांगतोय फोन उचल असे म्हणाला त्यानंतर मी व पंच नं.1 मिरजकर असे हुपरी गार्डन मंगल कार्यालय येथे दाखल झालो. त्यानंतर खाडे साहेब यांनी माझ्या गळ्यामध्ये लेसव्दारे अडकवलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला.
त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 मिरजकर यांना सापळा कारवाईची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.
सदर वेळी खाडे साहेब यांनी केलेल्या सापळा कारवाई मध्ये फराकटे तलाठी हे कार्यालयात हजर नसल्यामुळे भेट झाली नाही तेथे हजर असलेले खाजगी इसम गणेश कांबळे यांची भेट झाली असता त्यांनी तक्रारदार यांना लोकसेवक फराकटे यांना स्वत: संपर्क करणे बाबत सांगुन आपण कोणत्याही फंदात पडत नाही असे सांगुन लाच रक्कम बाबत कोणतीही चर्चा केली नाही तसेच लोकसेवक श्री.फराकटे यांना निरोप देत असल्याचे सांगुन तक्रारदार यांना फोन उचलण्यास सांगितल्याचे निष्पन होत असल्याने सापळा कारवाई मागे घेतली. त्यानंतर खाडे साहेबांनी मला तसेच पंच व सापळा पथकास गोपनीयाता राखणे बाबत सुचना दिल्या. तसेच संपर्क केल्यानंतर उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी मोटार सायकल वरून निघून गेलो.
त्यानंतर मी दि. 18.02.2025 रोजी खाडे साहेब यांना कॉल करून श्री. फराकटे तलाठी यांची भेट घेवून नोंदीचे कामाबाबत विचारपूस करणार असलेबाबत सांगितले. त्यावेळी खाडे साहेबांनी मला भोरा म्हसोबा फाटा ते माधवनगर जाणारे रोड लगत असले हुपरी गार्डन मंगल कार्यालया समोरील निर्जन ठिकाणी येणे बाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे हुपरी गार्डन मंगल कार्यालया समोरील निर्जन ठिकाणी आलो. श्री.फराकटे तलाठी यांची भेट घेवुन ते लाच रक्कम स्विकारतील अशी खात्री वाटत असल्याने पुन्हा सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चीत केले.
त्यानंतर खाडे साहेबांनी मला लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध आहे का असे विचारले असता मी एकुण

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Kiran Vasantrao Chougale(I (Inspector)) / DGPKVCM8201 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):
**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Kiran Vasantrao Chc
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPKVCM8201

ठाणे अंमलदार
सांगली ग्रामीण पोलीस ठाणे